**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक १९ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारचे चार कंपन्यांशी सामंजस्य करार; २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीचे लक्ष्य.**
2. **नागपूर विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध होण्यासाठी सर्वपक्षी नेत्यांशी चर्चा करणार असल्याचं महसूलमंत्री बावनकुळे यांचं प्रतिपादन.**
3. **पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैसे वाढ.**
   **आणि**
4. **विदर्भात तीव्र उष्णतामान; सर्व जिल्हयांत तापमान उच्चांकी पातळीवर.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मुख्यमंत्री फडणवीस

महाराष्ट्रात अणुऊर्जा निर्मितीसाठी राज्य सरकारने चार कंपन्यांशी आज सामंजस्य करार केले. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड अर्थात एनटीपीसीएल, अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि बजाज उद्योग समूहाच्या ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड या चार कंपन्यासोबत सुमारे साडेसहा लाख कोटी रूपये गुंतवणुकीचे हे सामंजस्य करार असून यातून २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा तसेच १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत असून स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

चंद्रशेखर बावनकुळे

महायुतीकडे ७५ टक्के मतदान असल्याचा दावा करत देशासमोरील सध्याचे संकट लक्षात घेता नागपूर विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची

निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्व पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. राज्यातील ज्या निवडणुका बिनविरोध होऊ शकतात, त्यासाठीही पुढाकार घेतला जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. बावनकुळे आज नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. पेट्रोल दरवाढ आणि संभाव्य तुटवड्याबाबत बोलताना अखाती देशांमधील परिस्थितीमुळे देशासमोर मोठ संकट निर्माण झाल आहे. त्याचे परिणाम भारतावरही होणार असल्याचं सांगितलं. कोणतेही राजकारण न करता देशहितासाठी पंतप्रधानांना पाठबळ दिल्यास आपण या संकटातून बाहेर पडू, अस ते म्हणाले.

पेट्रोल आणि डिझेल

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आज प्रति लिटर ९० पैसे वाढ झाली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीतली ही दुसरी दरवाढ आहे. मुंबईत पेट्रोल १०७ रुपये ५९ पैसे आणि डिझेल ९४ रुपये ८ पैसे, प्रति लिटर इतक झालं आहे. अमेरिका आणि इस्राएलनं इराणमध्ये छेडलेला संघर्ष आणि त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या तेल वाहतुकीत आलेला व्यत्यय, यामुळे जगभरात कच्च्या तेलाच्या किमतीने उसळी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ झाली. दरम्यान, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ९० पैसे वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकार जनतेची लूट करत असून विशिष्ट उद्योगपतींनाच सूट देत आहे असा आरोप त्यांनी केला. जनतेला काटकसरीचा सल्ला देऊन सरकार जनतेवर महागाईचा भार टाकत आहे, अशी टीका खरगे यांनी समाज माध्यमावरल्या संदेशात केली.

विधानपरिषद निवडणूक

वर्धा - चंद्रपूर - गडचिरोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक 18 जून रोजी होणार आहे. यासाठी तिनही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे 977 कार्यरत सदस्य मतदानाचा हक्क बजावणार आहे. यात सर्वाधिक चंद्रपूर जिल्ह्यातील 469 सदस्य, वर्धा जिल्ह्यातील 264 तर गडचिरोली जिल्ह्यातील 244 स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्य मतदारांचा समावेश आहे. तिनही जिल्ह्यात 18 मे पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या आचारसंहितेचे सर्वांनी पालन करावे, असं आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा चंद्रपूर जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी केलं आहे.

नागपूर

नागपूर स्थानिक प्राधिकरण मतदार संघाच्या विधान परिषदेसाठीच्या निवडणुकीत जिल्हयातील नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका तसेच कामठी येथील कटक मंडळातील तीन नामनिर्देशित सदस्य असे एकूण 834 सदस्य मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

मनपाचा अर्थसंकल्प

नागपूर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सादर करण्यासाठी आज नागपुरातील सुरेश भट सभागृहात विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. मात्र विधानपरिषदेच्या निवडणुकीची तारीख जाहीर होताच आचारसंहिता लागू झाल्याने अर्थसंकल्प सादरीकरण पुढे ढकलण्यात आल्याची माहिती महापौर नीता ठाकरे यांनी सभासदांना दिली.

स्वरसंध्या 2026

आकाशवाणी नागपुर केन्द्राव्दारे ऑल इंडिया रेडिओला 90 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने स्वरसंध्या  या विशेष सुगम संगीत सभेचं  आयोजन आज संध्याकाळी 6.30  वाजता सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर इथं  करण्यात आल आहे. या सभेत सुगम गायक  श्याम पोहरे यांची भक्तिगीत, प्रसन्न जोशी यांचं गजल गायन तसच सुगम गायीका हेमलता पोपटकर आणि मोनिका भोयर भावगीत भावगू सादर करतील.

अशोक खरात

७० कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्यात भोंदूबाबा अशोक खरात याला अटक करण्याची मुभा मुंबईतल्या पीएमएलए न्यायालयाने आज सक्तवसुली संचालनालयाला दिली. लैंगिक अत्याचार आणि फसवणूक, खंडणी वसुली प्रकरणात अशोक खरात याला यापूर्वीच विविध गुन्हयांप्रकरणी न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. आता ईडीकडूनही त्याला अटक होणार आहे. खरात हा एका मोठ्या खंडणी रॅकेटचा सूत्रधार असल्याचा आणि 'बेनामी' बँक खात्यांच्या माध्यमातून ७० कोटींहून अधिक रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचा आरोप ईडीने केला आहे.

भटके कुत्रे

सार्वजनिक ठिकाणी पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर पुन्हा सोडून दिलं जाऊ नये, हा यापूर्वी दिलेला आपला आदेश मागे घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. नोव्हेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या या आदेशात सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या याचिका न्यायमूर्ती विक्रम नाथ

यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं फेटाळल्या आणि अशा कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्येच ठेवण्याचे निर्देश दिले.

स्मार्ट-महावितरण

‘स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट)’ योजनेअंतर्गत पात्र घरगुती वीज ग्राहकांना केंद्र आणि  राज्य शासनाच्या संयुक्त अनुदानातून अवघ्या 2,500 रुपयांत 1 किलोवॅट सौर यंत्रणा बसविण्याची संधी मिळणार आहे. दारिद्र्यरेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसह नागपूर परिमंडळात एकूण 3 लाखांहून अधिक ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळणार असून, वीज बिलातून कायमची मुक्ती मिळण्याची शक्यता आहे. महावितरणने पात्र ग्राहकांनी तातडीने नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा, अस आवाहन केल आहे.

घागर मोर्चा

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील वडनेर भोलजी इथं निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाई विरोधात महिलांनी रिकाम्या घागरी घेऊन ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढला. जल जीवन मिशन योजना राबवूनही अनेक महिन्यांपासून नळांना पाणी मिळत नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. पाण्यासाठी महिलांना रोज ३ किलोमीटर पायपीट करावी लागत असल्यानं संताप व्यक्त करण्यात आला. पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

‘ट्रायबल फेलो’

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत दोन ‘ट्रायबल फेलो’ पदांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. ही नियुक्ती 10 महिन्यांच्या कालावधीसाठी करण्यात येणार असून निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा 20 हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी दिनांक  25 मे रोजी सकाळी 10.30 वाजल्यापासून वॉक-इन इंटरव्ह्यूसाठी आवश्यक कागदपत्रांसह एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा येथे उपस्थित राहण्याचं आवाहन प्रकल्प अधिकाऱ्यांनी  प्रसिध्दी पत्रकाव्दारे केलं आहे.

खांडुरी निधन

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं आज देहराडून इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. १९५४ मधे लष्करात दाखल होऊन ते १९९१ मधे  मेजर जनरल पदावरुन निवृत्त झाले. १९८३

मधे त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करत गढवाल मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधित्व केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचं मंत्रीपद त्यांनी सांभाळलं.

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये उन्हाचा तडाखा कायम असून आज दुपारी अडीच वाजता मोजलेल्या तापमानानुसार अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक 46.2 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. वर्धा इथं 46, अकोला इथं 45.3, नागपुर इथं 45.2 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. याशिवाय चंद्रपूर इथं 44.4, गडचिरोली इथं 43.4, गोंदिया इथं 41 तर बुलढाणा इथं 40.2 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल शुष्क तापमान नोंदवण्यात आलं. आज अमरावती, वर्धा, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तीव्र उष्णतामानाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून उद्या आणि परवा अमरावती, अकोला आणि वर्धा इथं ऑरेंज अलर्ट कायम राहणार आहे. दरम्यान आज आणि उद्या नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

****